




दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४०४ बुधवार दि ०१ जुलै २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# ठाकरेसेनेतून शिंदेसेनेत नव्हे, कायम शिवसेनेतच! भाईंचा गोऱ्हे पॅटर्न नेमका काय?

**वृत्तसंस्था-मुंबई**

उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी शिवसेना उबाठाचे विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांचा पक्षप्रवेश घडवून आणत उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिला आहे. गेल्या आठवड्यात लोकसभेतील ठाकरेसेनेचे ९ पैकी ६ खासदार फोडताना शिंदेंनी पक्षांतरबंदी कायद्याला पद्धतशीर बगल दिली. तर यावेळी विधान परिषदेचे सदस्य असलेल्या अहिर यांना पक्षात घेताना शिंदेंनी पक्षांतरबंदी कायद्यातील पळवाटेचा आधार घेतला. २०१९ मध्ये सचिन अहिर यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी शिवसेना अखंड होती. १९९९, २००४ आणि २००९ मध्ये सचिन अहिर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर विधानसभा निवडणूक लढवली आणि विजयी झाले. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारमध्ये ते राज्यमंत्री होते. जून २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अहिर यांनी शिवसेनेत प्रवेश केला. २०२२ मध्ये त्यांना ठाकरेंनी विधान परिषदेवर संधी दिली. त्यावेळीही शिवसेना अखंड होती. ते अखंड शिवसेवेकडून विधान परिषदेवर गेले होते. सचिन अहिर यांना आपल्या गोटात आणताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी नीलम गोऱ्हे पॅटर्न वापरला आहे. नीलम गोऱ्हे यांना उद्धव ठाकरे ंनी चारवेळा विधान परिषदेवर संधी दिली. २००२ ते २००८, २००८ ते २०१४, २०१४ ते २०२० या कालावधीत ठाकरेंनी नीलम गोऱ्हे यांना विधान परिषदेवर संधी दिली. २०१९ मध्ये त्या विधान परिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवडून आल्या. २०२० मध्ये ठाकरेंनी त्यांना विधान परिषदेवर पुन्हा संधी दिली. त्यावेळी राज्यात महाविकास आघाडीचं सरकार होतं. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. जून २०२२ मध्ये शिंदे यांनी शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठं बंड केलं. त्यांनी ४० आमदारांसह ठाकरेंची साथ सोडली. ठाकरे यांचं सरकार कोसळलं. पक्ष आणि चिन्हदेखील ठाकरेंच्या हातून गेलं. शिवसेनेची सुत्रं शिंदेंकडे जाताच वर्षभरानंतर नीलम गोऱ्हेंनी ठाकरेंची साथ सोडली. त्यामुळे त्यांचं उपसभापतीपदही कायम राहिलं. आता सचिन अहिर यांना शिवसेनेत घेताना



शिंदे यांनी नीलम गोऱ्हे पॅटर्न वापरला आहे. शिवसेना एकसंध असताना, शिवसेनेकडून विजयी झालेल्या, विधान परिषदेवर गेलेल्या सचिन अहिर यांना शिंदेंनी आपल्याकडे घेतलं आहे. त्यामुळेच अहिर यांच्या पक्षप्रवेशावेळी शिंदेंनी पक्षांतरावर भाष्य करताना ते शिवसेनेकडून निवडून गेले होते आणि आता ते शिवसेनेतच येत आहेत, असं म्हटलं. विशेष म्हणजे नीलम गोऱ्हे यांनी शिंदेसेनेत जाऊन त्यांचं उपसभापतीपद कायम राखलं. तर अहिर शिंदेसेनेत जाऊन उपसभापतीपद मिळवणार आहेत. या निवडणुकीसाठी त्यांनी अर्ज दाखल केला आहे. महायुतीचं संख्याबळ पाहता अहिर यांचा विजय निश्चित आहे. एकनाथ शिंदे यांनी सचिन अहिर यांना शिवसेनेत परत आणताना वापरलेल्या नीलम गोऱ्हे पॅटर्न विषयी आपले मत कमेंट बॉक्समध्ये शेअर करा.

# सचिन अहिरांचं नाव घेताना शिंदे चुकले, सगळेच हसले; ठाकरेंना धक्का, ३० जूनचा योगायोगही सांगितला

**वृत्तसंस्था-मुंबई**

मुंबई: विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी महायुतीकडून सचिन अहिर यांनी अर्ज दाखल केला आहे. कालपर्यंत शिवसेना उबाठामध्ये असलेल्या सचिन अहिर यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. यानंतर शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत त्यांचं पक्षात स्वागत केलं. शिवसेना कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. त्यामुळेच आज बरेच जण पक्षात स्वत:हून येत असल्याचं त्यांनी सांगितलं. आज आमदार सचिन तेंडुलकर, असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेला सुरुवात केली. यानंतर त्यांनी आपली चूक दुरुस्त करत आमदार सचिन अहिर अशी सुधारणा केली. अहिर यांनी सचिन प्रमाणेच आज षटकार मारल्याचं म्हणत शिंदेंनी त्यांचं कौतुक केलं. गेल्या आठवड्यात ६ खासदारांनी शिवसेनेत



प्रवेश केला. त्यांनी षटकार ठोकले. आज सचिन अहिर यांनी षटकार ठोकल्याचं शिंदे म्हणाले. सहा खासदार आमच्या पक्षात येताच काही लोक त्यांच्या मतदारसंघात गेले. तुडवण्याची भाषा केली. पण आम्ही जोडण्याची भाषा करतो. आम्ही तोडकाम नाही, जोडकाम करतो, अशा शब्दांत शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर नाव न घेता टीका केली. विधानसभेचे तीन टर्मचे आमदार, एक टर्म विधान परिषदेचे सदस्य, कामगारांचे नेते, गिरणी कामगारांच्या, कोळ्यांच्या समस्यांशी जाण असलेले नेते असलेले सचिन अहिर अशा शब्दांत शिंदे यांनी सचिन अहिर यांचं कौतुक केलं. २२ जून २०२२ रोजी आम्ही शिवसेनेत उठाव केला. बाळासाहेबांचे विचार जपण्यासाठी, धनुष्यबाण जपण्यासाठी आम्ही उठाव केला. त्या उठावानंतर ३० जून २०२२ रोजी मी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. योगायोग म्हणजे आज त्याला ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. आज ३० जून आहे. त्याच दिवशी सचिन अहिर यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. त्याबद्दल मी त्यांचं अभिनंदन करतो, असं शिंदे म्हणाले. सचिन अहिर यांच्या पक्षप्रवेशामुळे कामगार क्षेत्रात शिवसेनेची ताकद वाढली आहे. महायुतीकडे विधानसभेत, विधान परिषदेत बहुमत आहे. त्यामुळे सचिन अहिर सहज निवडून येतील. यापुढे ते केवळ मुंबईत नव्हे, तर राज्यसभरात काम करताना दिसतील. शब्दाला पाळणाऱ्या, बाळासाहेबांचे विचार पुढे नेणाऱ्या पक्षात सचिन अहिरांचं स्वागत आहेत. शिवसेनेत त्यांना नक्की न्याय मिळेल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. शिंदेसेनेच्या वाढत्या ताकदीचा महायुतीवर काय परिणाम होऊ शकतो? याचे आगामी राजकारणावर कसे पडसाद उमटू शकतात? याबाबत तुमची मते कमेंट बॉक्समध्ये मांडा.

# अधमाचा झटपट न्याय



पुणे जिल्ह्यातील नसरापूरमधील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या नराधमाला फाशीविना अन्य कोणतीही शिक्षा अपुरीच ठरली असती. विशेष न्यायालयाने सोमवारी त्याला देहदंड सुनावलाच; मात्र गुन्हा घडल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांत तपास आणि दोन महिन्यांत न्यायालयातील सुनावणी पार पाडलेली वेगवान प्रक्रिया पाहता, न्यायसंस्था, वकील आणि पोलिस यंत्रणाही अभिनंदनास पात्र आहेत. हा अमानुष गुन्हा करणाऱ्या भीमराव कांबळे या ६५ वर्षांच्या नराधमाला फाशीची शिक्षा सुनावल्याने त्या चिमुरडीचा जीव परत येणार नाही; मात्र तपास आणि न्याययंत्रणेतील विलंबामुळे मोकाट सुटलेल्या गुन्हेगारांना जरब आणि सर्वसामान्यांच्या मनांत न्यायव्यवस्थेविषयीचा विश्वास दृढ करणारी ही घटना म्हणावी लागेल. अशा सूत्रबद्ध पद्धतीने तपास आणि साक्षी-पुराव्यांची प्रभावी बांधणी-मांडणी करून असे खटले वेगाने निकाली काढणे, हा अपवाद न राहता तीच यंत्रणांची कार्यसंस्कृती बनली, तर कायद्याच्या राज्याकडे वाटचाल सुरू झाली, असे नक्की म्हणता येईल. अर्थात, या शिक्षेविरोधात उच्च-सर्वोच्च न्यायालयातील अपील आणि दयेचा अर्ज अशी प्रक्रिया अजून बाकी असल्याने या शिक्षेची अंमलबजावणी होणे अद्याप बाकी आहे; ती प्रक्रियासुद्धा वेगाने पार पडेल, तेव्हाच न्याय झाला, असे म्हणता येऊ शकेल. ही पुण्यातली मुलगी एक मे रोजी दुपारी अंगणात खेळत होती. तेव्हा आरोपीने तिला फसवून एका गोठ्यात नेले आणि अत्याचार करून तिचा खून केला. या निर्घृण कृत्यामुळे सरकारला प्रचंड जनआक्रोशाला तोंड द्यावे लागले. संतापलेल्या नागरिकांनी बंदही पाळला आणि महामार्गसुद्धा रोखून धरला होता. त्या पार्श्वभूमीवर काही तासांमध्ये आरोपीला पकडण्यात आले आणि विशेष तपास पथकाची स्थापनाही करण्यात आली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने तांत्रिक पुराव्यांवर आधारित तपास झाला. एरव्ही काही महिने लागणारा न्यायवैद्यक अहवाल दोन दिवसांतच सादर झाला; जनक्षोभ उसळल्याने आरोपीला प्रत्यक्ष जागेवर नेता आले नाही. त्यामुळे व्हर्च्युअल पंचनामा करण्याचा नवा मार्ग यंत्रणांना दिसून आला आहे. पोलिसांनी पंधरा दिवसांतच बाराशे पानांचे आरोपपत्र सादर केले. पुढे न्यायालयात ५५ साक्षीदारांची तपासणी-उलट तपासणी अशी प्रक्रिया पार पाडून दोन महिन्यांत विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली. या संपूर्ण सुनावणीदरम्यान सरकार किंवा आरोपीच्या वकिलांनी वेळ मागून घेतला नाही आणि एकदाही पुढील तारीख देण्यात आली नाही, हे या खटल्याचे वैशिष्ट्य. परिस्थितीजन्य पुरावे, डीएनए अहवाल, न्यायवैद्यकीय पुरावे अशा खटल्यांमध्ये किती महत्त्वाचे ठरतात, याचीही प्रचिती या निमित्ताने आली. आरोपीचा गुन्हा दुर्मीळातील दुर्मीळ असल्याचे सिद्ध करण्यात सरकारपक्षाला यश आले; त्याप्रमाणेच तपास यंत्रणा व न्यायसंस्थेने दाखवलेली तत्परता दुर्मीळ ठरू नये, एवढी अपेक्षा चुकीची ठरणार नाही. या अमानवी कृत्याच्या विरोधातील असंतोषाच्या पार्श्वभूमीवर गृहखात्याचा कारभार सांभाळणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले कडक आदेश आणि जिल्हा पोलिस प्रमुख संदीपसिंग गिल यांनी ठेवलेली देखरेख यांमुळे वेगाने प्रक्रिया पार पडली. मात्र, प्रत्येक प्रकरणात असे का घडत नाही, हा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न चुकीचा नाही. अनेक गुन्ह्यांमध्ये तपासात विलंब-ढिलाई घडते; साक्षीदारांकडून आणि कागदपत्रांद्वारे विश्वासार्ह माहिती मिळवून परिणामकारक मांडणी होत नाही. न्यायालयांमध्येही मोठा विलंब होतो. त्यामुळेच न्यायास विलंब म्हणजे न्यायास नकार, याचा अनुभव येतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी विविध पातळ्यांवर सुधारणा करणे आवश्यक आहे. राज्यात पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असून, ग्रामीण भागांत तर हा प्रश्न प्रकर्षाने जाणवतो. वाहने आणि साधनांची कमतरता त्यांना नेहमीच भेडसावते. न्यायवैद्यक प्रयोगशाळा मोजक्या संख्येनेच असून त्यांच्यावर प्रचंड ताण असल्याने तेथून अहवाल मिळण्यास मोठा विलंब होतो. न्यायालयांत किरकोळ कारणांसाठी पुढील तारखा मागून घेतल्या जातात; तसेच न्यायाधीशांची संख्या, न्यायालयांच्या इमारतींपासून पायाभूत सुविधा असे प्रश्न कायम आहेत. त्यातून होणाऱ्या विलंबामुळेच नागरिकांचा न्याययंत्रणेवरील विश्वास उडत असल्याचे दिसते. त्यातूनच पोलिस एनकाउंटर करून झटपट न्यायाची सवय वाढत आहे. दोन वर्षांपूर्वी बदलापूर अत्याचार प्रकरणात आरोपीला ठार करण्यात आले; तसेच या प्रकरणातही संतप्त नागरिक आरोपीला आमच्या ताब्यात द्या, अशी मागणी करताना दिसून आले. मात्र, तो आभासी न्याय आहे; कायद्याने सर्व प्रक्रिया पार पाडून न्यायालयातून मिळणारा न्याय, हाच न्यायाचा खरा आणि शाश्वत मार्ग आहे. त्यासाठी विशेष न्यायालये-न्यायाधीशांची संख्या वाढवणे, न्यायवैद्यक प्रयोगशाळांची पुरेशी व्यवस्था आणि पोलिसांपासून ते न्यायव्यवस्थेपर्यंत पुरेसे व प्रशिक्षित मनुष्यबळ असे दीर्घकालीन उपाय केले, तरच अशा अनेक बालक-बालिकांना न्याय मिळेल.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ट्रम्प यांचा 'डिजिटल सेवा कर' लावणाऱ्या देशांना 100% आयात शुल्क आकारण्याचा इशारा

**मुंबई/वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी डिजिटल सेवा कर वसूल करणाऱ्या देशांना तीव्र इशारा दिला आहे. जे देश अमेरिकन कंपन्यांवर असा कर लावतील, त्यांच्याकडून अमेरिकेत येणाऱ्या सर्व वस्तूंवर १००% आयात शुल्क लावले जाईल, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. एवढेच नाही तर, संबंधित देशांसोबत झालेले सर्व जुने व्यापारी करारही रद्द केले जातील, अशी घोषणा त्यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' प्लॅटफॉर्मवर केली.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या मते, हा डिजिटल टॅक्स प्रामुख्याने गुगल (अल्फाबेट), मेटा (फेसबुक), ॲमेझॉन आणि ॲपल यांसारख्या मोठ्या अमेरिकन टेक कंपन्यांना लक्ष्य करण्यासाठी लावला जातो. त्यामुळे हा अमेरिकन



कंपन्यांवर अन्याय आहे. ट्रम्प यांच्या या इशाऱ्याचा भारतावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही. याचे मुख्य कारण म्हणजे, भारताने आधीच आपला 'गुगल टॅक्स' पूर्णपणे रद्द केला आहे. इक्वलायझेशन लेव्ही (गुगल टॅक्स) काय होता? भारताने २०१६ मध्ये परदेशी डिजिटल कंपन्यांच्या ऑनलाईन जाहिरातींच्या कमाईवर ६% कर लागू केला होता. ज्या कंपन्यांचे भारतात भौतिक कार्यालय नाही, पण त्या भारतीय बाजारातून कमाई करत होत्या, त्यांच्यासाठी हा नियम होता.

भारताने कधी रद्द केला? अमेरिकेसोबतचे व्यापारी संबंध सुधारण्यासाठी भारताने अर्थ विधेयक २०२५ द्वारे हा ६% कर १ एप्रिल २०२५ पासून पूर्णपणे रद्द केला. याआधी, २०२४ मध्ये ई-कॉमर्स कंपन्यांवर लागणारा २% करही भारताने काढून टाकला होता. त्यामुळे भारत आता ट्रम्प यांच्या या कारवाईच्या कचाट्यातून पूर्णपणे सुरक्षित आहे. ट्रम्प यांच्या या भूमिकेचा युरोपीय युनियन मधील देशांना मोठा फटका बसणार आहे. नुकताच युरोपीय युनियन आणि अमेरिका यांच्यात एक व्यापारी करार झाला होता, ज्याअंतर्गत युरोपीय वस्तूंच्या आयातीवर केवळ १५% कर लावण्याचे ठरले होते. मात्र, या करारातून 'डिजिटल सर्व्हिस टॅक्स'चा विषय बाजूला ठेवण्यात आला होता. आता ट्रम्प यांच्या नव्या भूमिकेमुळे हा करार धोक्यात आला आहे.

फ्रान्सने २०१९ मध्ये अमेरिकन टेक कंपन्यांवर ३% डिजिटल टॅक्स लावला होता. ट्रम्प यांनी नुकताच फ्रान्सला इशारा दिला आहे की, जर त्यांनी हा कर मागे घेतला नाही, तर फ्रान्सच्या प्रसिद्ध वाईन आणि शॅम्पेनवर १००% कर लावला जाईल. फ्रान्सव्यतिरिक्त ब्रिटन, ऑस्ट्रिया, स्पेन यांसारख्या युरोपीय देशांनाही अमेरिकेने आधीच इशारा दिला आहे. ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर युरोपीय कमिशनच्या प्रवक्त्याने सांगितले की, युरोप आपल्या अधिकारांचे आणि नियमांचे रक्षण करण्यासाठी 'तात्काळ आणि कठोर पावले' उचलेल. यामुळे येत्या काळात अमेरिका आणि युरोप यांच्यात मोठे व्यापारी युद्ध पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## उद्धव ठाकरे अन् फडणवीसांचा एकाच विमानाने प्रवास

**पुणे/वृत्तसंस्था**

राज्याच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या राजकीय घडामोडी घडत असल्याचं पाहायला मिळत आहे. मागील काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर'ची मोठी चर्चा सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या ६ खासदारांनी फुटून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असल्याने राजकारण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळत आहे. असं असतानाच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे.



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी एकाच विमानाने प्रवास केला असल्याची माहिती समोर आली आहे. या विमान प्रवासाचे काही व्हिडीओ आणि फोटो देखील समोर आले आहेत. त्यामुळे राज्याच्या राजकारणात नेमकं काय घडतंय? याबाबत आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे, संजय राऊत, आदित्य ठाकरे यांनी मुंबईवरून नागपूरला जाताना एकाच विमानामधून प्रवास केला आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांनी एकमेकांची विचारपूस करत हस्तांदोलन देखील केलं आहे. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये काही वेळ चर्चा झाल्याचंही सांगितलं जात आहे. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत, अनिल देसाई हे देखील उपस्थित होते.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून फुटून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या ६ खासदारांच्या लोकसभा मतदारसंघाचा दौरा उद्धव ठाकरे करणार आहेत. त्या अनुषंगाने मोठी तयारी देखील करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवरच उद्धव ठाकरे हे सध्या यवतमाळ आणि वाशिमच्या दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत. यावेळी नागपूरला विमानाने जात असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील त्याच विमानाने प्रवास केला आहे. त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. "इंधन बचतसाठी काही नेते खासगी विमानाने न जाता सर्वसामान्यांप्रमाणे एका विमानातून प्रवास करत असतील तर त्यावरून वेगळ्या प्रकारच्या राजकीय चर्चा उधाण येण्याचं काहीच कारण नाही. फार-फार तर एकत्रित प्रवास करणं यामागे राष्ट्रहित हेच कारण असू शकतं. यापेक्षा दुसरं काहीही नाही", अशी प्रतिक्रिया शिवसेनेच्या (ठाकरे) नेत्या सुषमा अंधारे यांनी दिली आहे.

## २२ लाख किलो भेसळयुक्त खाद्यपदार्थ जप्त

**मुंबई/वृत्तसंस्था**

राज्यातील नागरिकांना दर्जेदार, सकस आणि भेसळमुक्त खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांविरोधात सुरू केलेल्या कारवाईअंतर्गत महिन्याभरात तब्बल २२ लाख किलो भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ जप्त केले आहेत.

आरोग्यास हानीकारक व अस्वच्छ वातावरणात अन्नपदार्थ उत्पादन करणाऱ्या आस्थापनांविरोधात धडक मोहिम राबविण्यात येत असून सदर मोहिमेअंतर्गत अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी राज्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकून संबंधित अन्नपदार्थ निर्मिती आणि पुरवठा करणाऱ्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात केली आहे. त्यानुसार २५ मे ते २४ जून या कालावधीत एफडीएने मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर व अमरावती या विभागात संशयित, दर्जाहीन, असुरक्षित अन्नपदार्थ तसेच अस्वच्छ उत्पादन प्रक्रिया, भ्रामक जाहिराती करणे यांसह नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली. या कारवाईमध्ये ४३१ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून आंबे, दुध व दुग्धजन्य पदार्थ, तयार फळांची पेये, रंगमिश्रीत सुपारी, चहा पावडर, पिण्याचे पाणी, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, गुळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईसक्रीम, कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाल्याचे पदार्थ इत्यादी अन्न पदार्थ तसेच भेसळ करण्यासाठी वापरण्यात येणारे पदार्थ यांचा २९ कोटी ११ लाख ८५ हजार ३३० रुपये किंमतीचा २२ लाख ४ हजार १८२ किलो इतका साठा अन्न सुरक्षा व मानके कायद्याअंतर्गत जप्त करण्यात आला आहे. तसेच अन्न नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविले आहे.

शंका येताच तक्रार करा अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत शंका येताच नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा. तक्रार करतेवेळी स्वतःचे नाव व पत्ता, संपर्क क्रमांक, भेसळ केल्या जाणाऱ्या ठिकाणाचा या आस्थापनेचा अचूक पत्ता व कोणत्या अन्नपदार्थात भेसळ केली जाते याची माहिती तक्रारीत नमूद करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## "माझ्या मुलाची चूक असल्यास अटक करा, पण विनाकारण अडकवू नका", बजरंग सोनवणेंचं विलास घुले हत्या प्रकरणाबाबत वक्तव्य

**बीड/वृत्तसंस्था**

बीड जिल्ह्यात विलास घुले हत्या प्रकरणावरून राजकारण चांगलंच तापलं आहे. यावरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. विलास घुले हत्या प्रकरणातील सूत्रधार कोण? यावरून परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी विधानसभेत अनेक गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत ९ आरोपींना अटक केल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, विलास घुले हत्या प्रकरणातील पुरवणी जबाबात खासदार बजरंग सोनवणे यांचे पुत्र सौरव सोनवणे यांचं नाव आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. या संपूर्ण प्रकरणाबाबत आता खासदार बजरंग सोनवणे यांनी प्रतिक्रिया देत त्यांच्या मुलावरील आरोप फेटाळून लावले आहेत. 'माझ्या मुलाची चूक असल्यास अटक करा, पण विनाकारण अडकवू नका', असं बजरंग सोनवणे यांनी म्हटलं आहे. ते वृत्तवाहिनीशी बोलत होते.

"विलास घुले हत्या प्रकरणाच्या घटनेबाबत मी याआधी सांगितलं की, ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. या घटनेचं कोणीही समर्थन करणार नाही. मात्र, या प्रकरणात माझ्या मुलाचं नाव घेतलं जात आहे. या घटनेचा पोलीस तपास करत आहेत. मी पोलिसांना याआधी देखील सांगितलं की, माझा मुलगा बीड जिल्ह्यात आहे आणि पोलिसांना जी काही चौकशी करायची त्यासाठी आम्ही पूर्णपणे सहकार्य करू. आजही माझी भूमिका तिच आहे. आम्ही पोलिसांना पूर्णपणे सहकार्य करणार आहोत. मी माझ्या मुलाला कुठेही पळवून लावलं नाही किंवा लावणार नाही", असं खासदार बजरंग सोनवणे यांनी म्हटलं आहे.



धनंजय मुंडे यांनी आज विलास घुले यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी धनंजय मुंडे यांनी गंभीर आरोप केले आहेत. 'विलास घुले हत्या प्रकरणात पोलिसांनी ९ आरोपींना अटक केली, मग एका आरोपीला अटक का केली नाही? तो लाडका आहे का?', असं म्हणत धनंजय मुंडे यांनी अनेक सवाल उपस्थित केले आहेत. धनंजय मुंडे म्हणाले की, "विलास घुले हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्याची गरज आहे. या घटनेतील ९ आरोपींना पोलिसांनी अटक केली. मात्र, आणखी एका आरोपीला अटक केलं नाही. तो एक आरोपी पोलिसांचा लाडका आहे का? ३०२ मध्ये एखाद्या आरोपीला अटक होत नाही, का? तर त्याची वेगळी तपासणी सुरू आहे. त्या एका व्यक्तीला पोलिसांना या प्रकरणातून बाहेर काढायचं आहे का? या घटनेतील जे काही पुरावे आहेत, ते नष्ट करण्यासाठी त्या आरोपीला बाहेर ठेवलं जात आहे का?", असे सवाल धनंजय मुंडे यांनी केले.

"विलास घुले हत्या प्रकरणातील एक आरोपी अजूनही मोकाट आहे. त्यामुळे ही भिती आहे की त्या आरोपीने जर या घटनेतील काही पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तर या प्रकरणातून काय बाहेर येईल? आमचा आता पोलिसांवर असा संशय आहे की त्यांना या प्रकरणात एका आरोपीला वाचवायचं आहे. त्यामुळे पोलीस त्याला अटक करत नाही. आज आम्ही सर्वांच्या उपस्थितीत सांगतो की त्या आरोपीला पोलिसांनी अटक करावी. एखाद्या गुन्ह्यात एकाला एक न्याय आणि दुसऱ्या गुन्ह्यात दुसऱ्याला वेगळा न्याय?", असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं.

# मोबाईल ॲपवरून तरुणाची फसवणूक, तरुणाला रात्रभर मारहाण; 30 हजार लुटले!

■ नागपूर/वृत्तसंस्था

समलिंगी मैत्रीसाठी वापरल्या जाणाऱ्या एका मोबाईल ॲपवरून ओळख करून एका अठरा वर्षांच्या तरुणाला भेटीसाठी बोलावण्यात आले. त्यानंतर त्याला रात्रभर वेगवेगळ्या ठिकाणी फिरवत मारहाण करून त्याच्याकडून तीस हजार रुपये उकळण्यात आले. मोबाईल फोडून पोलिसांत तक्रार केल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकीही देण्यात आली. या प्रकरणात मानकापूर पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे.



२२ जून रोजी मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास १८ वर्षीय तरुण नोकरी आटोपून दुचाकीने घरी जात होता. मानकापूर चौकात आरोपींपैकी एकाने त्याच्याकडे लिफ्ट मागितली. काही अंतर गेल्यानंतर त्या आरोपीने त्याच्या इतर साथीदारांना बोलावले. त्यानंतर पाचही आरोपींनी तरुणाची दुचाकीची चावी, बँक कार्ड आणि मोबाईल हिसकावून घेतला. तरुणाला त्याच्याच दुचाकीवर बसवून मानकापूर चौक, गोरेवाडा चौक, भरतवाडा रस्ता, रेल्वे रुळ परिसर, रिझर्व्ह बँक चौकाजवळील पेट्रोल पंप, तिडके विद्यालय परिसर, सदर छावणी आणि राजनगर अशा अनेक ठिकाणी फिरवले. पहाटे साडेतीनच्या सुमारास त्याला राजनगर येथे सोडून दिले.

आरोपींनी तरुणाला शिवीगाळ करून धमकावले. त्यानंतर त्याला त्याच्या ओळखीच्या लोकांना खोटे कारण सांगून पैसे मागण्यास भाग पाडले. त्याच्या खात्यात तीन व्यवहारांमधून दहा हजार रुपये जमा करून घेतले. त्यानंतर त्याचे बँक कार्ड वापरून आणखी वीस हजार रुपये काढले. अशा प्रकारे एकूण तीस हजार रुपये उकळले. पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपींनी तरुणाचा मोबाईल दगडाने फोडला. तसेच पोलिसांकडे तक्रार केल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवू, अशी धमकी दिली.

तपासात आरोपींपैकी एका जणाने समलिंगी मैत्रीसाठी वापरल्या जाणाऱ्या एका मोबाईल ॲपवरून तरुणाशी संपर्क साधल्याचे उघड झाले. सतत संदेश पाठवून त्याच्याशी मैत्री केली आणि नंतर भेटीसाठी मानकापूर चौकात बोलावले. तेथूनच हा सगळा प्रकार घडला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर मानकापूर पोलिसांनी तीन स्वतंत्र तपास पथके तयार केली. घटनास्थळ आणि त्या परिसरातील सर्व चित्रित करणारे कॅमेरे तपासण्यात आले. गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेण्यात आला. कॅमेऱ्यातील चित्रे आणि आरोपींच्या कबुलीजबाबावरून त्यांचा गुन्ह्यात सहभाग स्पष्ट झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

मोहम्मद शेख जाकरी शेख फारुख (२३), कुणाल दिलीप मांजरखेडे (१९), शोएब अली सुलतान अली सय्यद (२३), फरान फैजान खान (२१) आणि शिजान शेख फकुद्दीन अली अहमद (२१) या पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे..या प्रकरणात दरोड्याचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडून फिर्यादीकडून उकळलेले दहा हजार रुपये आणि त्याचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल, सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलिस आयुक्त विनीता साहू, पोलिस उपायुक्त अन्नपूर्णा सिंह आणि सहाय्यक पोलिस आयुक्त सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मानकापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हरेश काळसेकर, पोलिस उपनिरीक्षक रोहन पाटील, पोलिस उपनिरीक्षक भारत कांबळे, राजेश बरणे, राकेश खोब्रागडे, राहुल गवई, प्रशांत खंडारे, विपीन रक्षे, धीरज भोपडे आणि अनिल राठोड यांनी ही कारवाई करून आरोपींना अटक केली. या पाच आरोपींनी समलिंगी मैत्रीसाठी वापरल्या जाणाऱ्या तसेच इतर डेटिंग ॲपच्या माध्यमातून आणखी काही जणांना भेटीसाठी बोलावून त्यांच्याकडून पैसे आणि मौल्यवान वस्तू हिसकावल्या असण्याची शक्यता आहे. बदनामीच्या भीतीने अनेकांनी तक्रार केली नसावी. अशा सर्वांनी मानकापूर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. तसेच कोणतेही डेटिंग ॲप वापरताना नागरिकांनी काळजी घ्यावी, असेही पोलिसांनी म्हटले आहे.

## दिव्यांग मुलीच्या मदतीवरही नजर ! संरक्षण अधिकाऱ्यास लाच घेताना पकडले; कंत्राटीही अडकला

■ बुलढाणा

आजकाल सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला आहे. काही अपवाद वगळला तर बहुतेक शासकीय, निमशासकीय कार्यालयात तर चिरीमिरी दिल्याशिवाय कामच होत नाही अशी ओरड आहे. गलेलठ्ठ पगार असतानाही वर कमाई चा मोह टाळता येत नाही, अशी काही कर्मचाऱ्यांची गत आहे.



लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथील कारवाईने ही बाब स्पष्ट झाली. या प्रकरणात महिला व बाल विकास विभागाच्या संरक्षण अधिकाऱ्यासह कंत्राटी कर्मचाऱ्यास रंगेहात पकडण्यात आले. कांतीज्योती बालसंगोपन योजनेच्या लाभासाठी त्यांनी २४ हजारांची मागणी केली होती. त्यातील पहिल्या हफ्त्याची रक्कम, १२ हजार रुपये स्वीकारताना त्यांना पकडण्यात आले. जळगाव जामोद येथे ही कारवाई करण्यात आली. महिला व बालविकास विभागातील संरक्षण अधिकारी तुषार रमेश राणे हा मलकापूर येथे कार्यरत आहे. त्याच्याकडे संग्रामपूर चा कारभार आहे. तक्रारदाराच्या दिव्यांग भाचीला, कांतीज्योती बालसंगोपन योजनेअंतर्गत मिळालेल्या आर्थिक मदतीच्या बदल्यात तसेच भविष्यातील लाभ मिळवून देण्यासाठी २४ हजार रुपयांची लाचेची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणात जळगाव जामोद येथील तालुका शेतकरी खरेदी-विक्री संघ कार्यालयासमोर सापळा रचून कारवाई करण्यात आली. यावेळी १२ हजार रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताना तुषार राणे यांना एसीबीने ताब्यात घेतले. यासाठी त्याला बहूद्देशिय कंत्राटी कर्मचारी जगन्नाथ तुकाराम भिवटे याने सहकार्य केले.

या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७, १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. एसीबी चे अमरावती येथील पोलीस अधीक्षक बापू बांगर, बुलढाणा पोलीस उप अधीक्षक भागोजी चोरमले यांच्या मार्गदर्शनखाली रमेश पवार, विलास गुसांगे, प्रवीण बैरागी, अमोल झिने, प्रफुल्ल आमले, दीपक जाधव, जगदीश पवार, लक्ष्मीकांत इंगळे, श्याम भांगे, गजानन गाल्डे, रंजित व्यवहारे, नितीन शेटे, अनिता वारंगने यांनी ही कारवाई केली.

## केतन अग्रवाल हत्या प्रकरणात आरोपीच्या बड्या वकिलाची नियुक्ती

■ नांदेड/वृत्तसंस्था

पुण्यात गाजलेल्या केतन अग्रवाल खून प्रकरणात आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज धाडसी निर्णय घेतला. या प्रकरणात पोलिसांची बाजू न्यायालयात भक्कमपणे मांडण्यासाठी जेष्ठ वकीलाची नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे येथील २६ वर्षीय व्यावसायिक केतन विशाल अग्रवाल यांचा मृत्यू हा अपघात नसून त्यांची मंगेतर (होणारी पत्नी) सिया गोयल हिने आपल्या प्रेमीच्या मदतीने केलेली हत्या असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. लोणावळ्याजवळील ऐतिहासिक लोहगड किल्ल्यावर १८ जून २०२६ रोजी ट्रेकिंग दरम्यान केतन यांना ४०० फूट खोल दरीमध्ये ढकलून देऊन मारण्यात आले होते मारण्यात आले होते.

लोणावळा ग्रामीण परिसरात झालेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्येच्या प्रकरणात केतन अग्रवाल यांचे वडिल विशाल अग्रवाल यांनी आज पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि आपल्या मुलाला न्याय मिळावा, अशी मागणी केली.

या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी कोणतीही कसूर ठेवली जाणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी त्यांना दिले. या प्रकरणात जलदगती न्यायालय आणि विशेष सरकारी वकिल म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची त्यांची मागणी सुद्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मान्य केली आणि तसे निर्देश विधी व न्याय विभागाच्या सचिवांना दिले. ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांनीही या प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास संमती प्रदान केली आहे.

## पालकांच्या मद्यधुंद नशेत चार महिन्यांचे बाळ रस्त्यावर पडले



■ चंद्रपूर/वृत्तसंस्था

चार महिन्यांचे निष्पाप बाळ आईच्या कुशीत सुरक्षित असायला हवे होते; मात्र आई-वडिलांच्या मद्यधुंद अवस्थेमुळे ते भररस्त्यात पडल्याची धक्कादायक घटना चिमूर तालुक्यातील भिसी बायपासवरील माउली धाब्याजवळ बुधवारी रात्री घडली. वेदनादायक बाब म्हणजे, बाळ रस्त्यावर पडल्याचेही त्या दाम्पत्याच्या लक्षात आले नाही. भिसी पोलिसांनी वेळीच धाव घेत बाळाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्याने मोठी दुर्घटना टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, चिमूर येथून नांदला गावाकडे फुलचंद राऊत व मीरा राऊत हे दाम्पत्य दुचाकीने निघाले होते. त्यांच्यासोबत अडीच वर्षांचे एक मूल आणि चार महिन्यांचे बाळ ही होते. प्रवासादरम्यान दोघेही मद्यधुंद अवस्थेत असल्याने त्यांच्या हातातून चार महिन्यांचे बाळ रस्त्यावर पडले. मात्र, मद्याच्या नशेत असल्याने बाळ खाली पडल्याची जाणीव त्यांना झाली नाही. बाळ पडल्यापासून सुमारे ७०० मीटर अंतरावर त्यांची दुचाकी घसरून अपघात झाला. त्यानंतरही बाळ मागे राहिल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. अपघातानंतर दाम्पत्य रस्त्यालगत मद्यधुंद अवस्थेतच पडून राहिले.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या काही वाहनचालकांच्या निदर्शनास रस्त्यावर पडलेले बाळ आणि पुढे अपघातग्रस्त दाम्पत्य आले. त्यांनी तातडीने भिसी पोलिसांना याची माहिती दिली..माहिती मिळताच ठाणेदार मंगेश भोंगाडे, पोलिस उपनिरीक्षक रवींद्र वाघ तसेच पोलिस कर्मचारी पिल्लेवान आणि लेंगुरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तातडीने बाळाला भिसी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. डॉक्टरांनी त्वरित उपचार सुरू केल्याने बाळाचा जीव वाचला. त्यानंतर दाम्पत्यालाही आवश्यक वैद्यकीय उपचारासाठी हलविण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मद्यप्राशन करून वाहन चालविण्याऱ्या प्रकारांबाबत संताप व्यक्त केला जात आहे. एका निष्पाप बालकाचा जीव पालकांच्या निष्काळजीपणामुळे धोक्यात आला असला, तरी पोलिसांच्या तत्परतेमुळे संभाव्य अनर्थ टळल्याने नागरिकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. या घटनेमुळे पालकांनी वाहन चालविताना आणि लहान मुलांसह प्रवास करताना अधिक जबाबदारीने वागण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# 6 प्रमुख खेळाडूंना दुखापती, 2 पदार्पणवीर; आयर्लंडच्या नवख्या संघाने असा दिला दणका

**लंडन/वृत्तसंस्था**

आयर्लंड संघाच्या भारताविरुद्धच्या या मालिकेवर हिंसाचाराच्या घटनांमुळे सावट होतं. त्यातच प्रमुख खेळाडू दुखापतग्रस्त झाल्याने आयर्लंडचा संघ एकदमच कमकुवत झाला. मात्र नव्या दमाच्या खेळाडूंनी बलाढ्य भारतीय संघाला चीतपट करण्याची किमया केली.

अनुभवी पॉल स्टर्लिंगने टी२० वर्ल्डकपनंतर कर्णधारपद सोडलं. त्यामुळे क्रिकेट आयर्लंडने लोकरन टकरकडे नेतृत्वाची धुरा सोपवली. पोटरीला झालेल्या दुखापतीमुळे पॉल खेळण्यासाठी उपलब्ध नव्हता. स्ट्रेस फ्रॅक्चरमुळे डावखुरा वेगवान गोलंदाज जोशुआ लिटील या मालिकेत खेळू शकणार नाहीये. पोटाला झालेल्या




दुखापतीमुळे मार्क अडेअर मालिकेबाहेर गेला. हाताला फ्रॅक्चर झाल्यामुळे कुर्तीस कॅम्पफर मालिकेचा भाग नाहीये. बॅरी मॅकार्थी लिगामेंट इंज्युरीमुळे कर्तव्यावर नाही तर खांदा आणि पायाच्या दुखापतीमुळे जॉर्डन नीलही उपलब्ध होऊ शकला नाही.

भारतात जन्मलेल्या जय मुंद्राने भारताविरुद्ध आज पदार्पण केलं. राजस्थानमध्ये जन्म झालेल्या जयने पदार्पणात पहिल्याच चेंडूवर विकेट पटकावत टीम इंडियाला धक्का दिला. ४ षटकात त्याने अवघ्या २५ धावांच्या मोबदल्यात २ विकेट्स पटकावल्या. जयच्या बरोबरीने मॅट हॉलार्डला पदार्पणाची संधी देण्यात आली. त्याने ३ विकेट्स पटकावत टीम इंडियाच्या फलंदाजीला खिंडार पाडलं. या दोन पदार्पणवीरांनीच भारतीय फलंदाजांना स्थिरावू दिलं नाही. रुब्येन विल्सन हाही पदार्पणाच्या शर्यतीत होता. गॅव्हिन होय या लेगस्पिनरला पदार्पण मिळण्याची शक्यता होती. अनुभवी क्रेग यंगच्या अनुपस्थितीत स्टीफन डोहनी या नव्या खेळाडूची संघात निवड करण्यात आली आहे.

आमच्या प्रमुख खेळाडूंना दुखापती झाल्या आहेत. ही खूपच वाईट गोष्ट आहे. त्यांचा अनुभव मोलाचा ठरला असता. पण एखाद्या वाईटातून चांगलंही घडू शकतं. नव्या खेळाडूंना यानिमित्ताने संधी मिळते आहे असं आयर्लंडचे निवडसमिती अध्यक्ष अँड्यू व्हाईट यांनी सांगितलं. १४सदस्यीय संघात ३ खेळाडू पदार्पणासाठी सज्ज आहेत असं ते म्हणाले होते. त्यांचा विश्वास या नव्या शिलेदारांनी सार्थ ठरवला.

आयर्लंडचे खेळाडू नवखे वाटले तरी ते नियमितपणे इंग्लंडच्या काऊंटी क्रिकेटमध्ये खेळतात. अनेक आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंच्या बरोबरीने खेळण्याचा अनुभव त्यांच्याकडे असतो. दडपणाच्या क्षणी खेळ कसा असावा याचा अनुभव त्यांच्याकडे आहे. आयर्लंडच्या खेळाडूंना खेळपट्टीचा नूर चांगलाच ठाऊक होता. मैदानाची कुठली बाजू लहान आहे हे त्यांना ठाऊक होती. त्यानुसार कर्णधार

# जर्मनीविरुद्ध विजयाने इक्वेडोरमध्ये आनंदाची लाट; राष्ट्रपती भावुक, देशात सुट्टी जाहीर!

**बेलफास्ट/वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. यासह अनेक मोठे उलटफेरही पाहायला मिळाले आहेत. त्यापैकीच एक उटलफेर म्हणजे इक्वेडोने बलाढ्य जर्मनीला पराभूत केलं आहे.



इक्वेडोरने ४ वेळा वर्ल्ड चॅम्पिनय होण्याचा मान पटकावणाऱ्या जर्मनीवर २-१ ने विजय मिळवला आहे. या विजयासह इक्वेडोरने फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील बाद फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. या ऐतिहासिक विजयानंतर इक्वेडोरचे राष्ट्रपती डॅनियल नोबोआ यांनी मोठी घोषणा करत, एक दिवसाची सार्वजानिक सुट्टी जाहीर केली आहे.

इक्वेडोरच्या ऐतिहासिक विजयानंतर राष्ट्रपती डॅनियन नोबोआने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन एक भावुक पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट शेअर करुन त्यांनी संघातील खेळाडू आणि मुख्य प्रशिक्षकांचे आभार मानले आहेत. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, "खेळाडू आणि मुख्य प्रशिक्षंकाचे मनापासून आभार. इतकी टीका, अपमान आणि कठीण परिस्थिती असताना दमदार पुनरागमन केलं आणि देशाला आनंद साजरा करण्याची संधी दिली. उद्या (शुक्रवारी) देशात सुट्टी असेल."

इक्वेडोरसाठी हा प्रवास मुळीच सोपा नव्हता. या संघाने वर्ल्ड चॅम्पियन संघावर मात केली. पण याआधी इक्वेडोर संघाला आयवरी कोस्ट संघाकडून १-० ने पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर कुराकाओ संघाविरुद्ध झालेला सामना ड्रॉ राहिला होता. तर जर्मनीचा संघ आधीच बाद फेरीसाठी पात्र ठरला होता. त्यामुळे दबाव पूर्णपणे इक्वेडोर संघावर होता. पण इक्वेडोर संघातील खेळाडूंनी स्वत:वर कुठलाही दबाव येऊ दिला नाही. सामना जिंकण्यासाठी प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या जर्मनीवर दमदार विजय मिळवला.

या सामन्यातील सुरुवातीला जर्मनीने नेहमीप्रमाणे आक्रमक खेळ करत हल्ला चढवला. फ्लोरियन विट्जच्या पासवर लेरॉय सानेने दमदार गोल केला. सामन्यातील ९ व्या मिनिटाला इक्वेडोरने गोल केला आणि १-१ ने बरोबरी केली. पहिला हाफ १-१ ने बरोबरीत समाप्त झाला होता. त्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये इक्वेडोरच्या खेळाडूंनी आणखी आक्रमक खेळ केला. सामना संपायला शेवटची १३ मिनिटे शिल्लक असताना, इक्वेडोरला कॉर्नर मिळाला. या संधीचं सोनं करुन गोंजालो प्लाटाने दमदार गोल केला आणि इक्वेडोरने २-१ आघाडी मिळवून दिली.

# खेळवायचं नव्हतं, मग घेतलं कशाला?

**कॅन्सास सिटी/वृत्तसंस्था**




भारत आणि आयर्लंड या दोन्ही संघांमध्ये २ टी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना बेलफास्टच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्याकडे सर्वच क्रिकेट चाहत्यांचं लक्ष लागून होतं, कारण १५ वर्षांचा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीला प्लेईंग ११ मध्ये स्थान मिळणार असल्याची चर्चा रंगली होती. पण असं काहीच झालेलं नाही. भारताचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्याला वैभव सूर्यवंशी पदार्पण करणार आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर श्रेयस अय्यरने नाही असं सांगितलं. दरम्यान वैभव खेळणार नसल्याची माहिती मिळताच, क्रिकेट चाहत्यांनी सोशल मीडियावर आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

सर्वच क्रिकेट चाहते वैभव सूर्यवंशीच्या पदार्पणाची आतुरतेने वाट पाहत होते. इतकेच नव्हे, तर १५ वर्षांचा वैभव पदार्पण करणार म्हणून सामन्याची तिकिटं सोल्ड आऊट आणि मैदान फुल हाऊस झालं होतं. पण त्याचं पदार्पण काही झालेलं नाही. एका युझरने पोस्ट करत म्हटले की, "जर वैभव सूर्यवंशी हा सामना खेळणार नसेल, तर आम्ही सामना पाहणारच नाही." तर आणखी एका युझरने पोस्ट करत लिहिले की, "त्यांना हे नकोय की, वैभवने आपल्या पाहिल्याच सामन्यात २०० धावांची खेळी करावी." तर आणखी एका युझरने पोस्ट शेअर करत लिहिले की, "वैभव फक्त पोस्टर बॉय आहे. त्याला प्लेईंग ११ मध्ये खेळणार नाही."

नाणेफेकीवेळी कर्णधार श्रेयस अय्यरने वैभवला न खेळवण्याचं कारण सांगितलं. तो म्हणाला, "नाही, तो अप्रतिम आणि स्फोटक फलंदाज आहे. पण आमच्या संघात एकापेक्षा एक अनुभवी खेळाडू आहेत. या खेळाडूंनी गेल्या काही महिन्यांमध्ये भारतीय संघासाठी दमदार कामगिरी केली आहे. त्यामुळे मला वाटतं, जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा त्याला संधी नक्की मिळेल."

# 'त्या' टर्निंग पॉईंटमुळे टीम इंडियाच्या हातातून असा निसटला सामना

**बेलफास्ट/वृत्तसंस्था**

भारत आणि आयर्लंड या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना पार पडला. बेलफास्टच्या मैदानावर पार पडलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात आयर्लंडने २ वेळच्या वर्ल्डचॅम्पियन भारतीय संघावर ३४ धावांनी ऐतिहासिक विजय मिळवला. आयर्लंडने या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना ९ गडी बाद १८२ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाचा डाव अवघ्या १४८ धावांवर आटोपला. यासह आयर्लंडने कुठल्याही फॉरमॅटमध्ये भारताविरूद्ध पहिल्या विजयाची नोंद केली.

**१)टॉप ऑर्डरच्या फलंदाजांचा फ्लॉप शो :** आयर्लंडने भारतासमोर १८३ धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान तसे मोठेच होते. पण भारतीय संघाची बॅटिंग लाइनअप पाहता, इतकेही कठीण नव्हते. भारतीय संघाला चांगल्या सुरुवातीची गरज होती. एका बाजूने अभिषेक शर्माने




किल्ला लढवत अर्धशतकी खेळी केली. पण त्याला इतर कुठल्याही फलंदाजाकडून हवी तशी साथ मिळाली नाही. संजू सॅमसन अवघ्या ५, इशान किशन १ आणि कर्णधार श्रेयस अय्यर अवघ्या ३ धावा करुन माघारी परतला. टॉप ३ फलंदाज स्वस्तात माघारी परतल्यामुळे संघ सुरुवातीलाच बॅकफूटवर गेला.

**२)आयर्लंडच्या नवख्या गोलंदाजांची दमदार गोलंदाजी :** या सामन्यात आयर्लंडकडून जय मुंद्रा आणि मॅथ्यू हॉलार्ड यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. दोघांनी आपल्या कारकिर्दीतील पहिल्याच सामन्यात दमदार गोलंदाजी केली. जय मुंद्राने पहिल्याच चेंडूवर दमदार फॉर्ममध्ये असलेल्या संजू सॅमसनला बाद केलं. यादरम्यान त्याने ४ षटकात अवघ्या २६ धावा खर्च करुन २ गडी बाद केले. तर मॅथ्यू होलार्डने इशान आणि श्रेयससारख्या फलंदाजांना बाद करुन भारताला ३ मोठे धक्के दिले.

**३) मधली फळी कोसळली :** टॉप ऑर्डरचे फलंदाज फ्लॉप ठरल्यानंतर मधल्या फळीतील फलंदाजांवर डाव सावरण्याची जबाबदारी होती. पण तिलक वर्मा अवघ्या १९ धावांवर आणि वॉशिंग्टन सुंदर अवघ्या ९ धावा करुन माघारी परतला. भारताला अनुभवी खेळाडूची कमतरता जाणवली, जो शेवटी फटकेबाजी करुन सामना फिनिश करु शकतो.

**४) आयर्लंडच्या कर्णधाराची अर्धशतकी खेळी :** पहिल्यांदाच आयर्लंडचं नेतृत्व करत असलेल्या लॉर्कन टकरने दमदार अर्धशतकी खेळी केली. त्याने भारताच्या फिरकी आणि वेगवान गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. यादरम्यान त्याने ३६ चेंडूंचा सामना करत महत्वपूर्ण ५० धावांची खेळी केली.

**५) डेथ ओव्हर्स :** डेथ ओव्हर्समध्ये भारतीय गोलंदाजांकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. आयर्लंडचे प्रमुख फलंदाज लवकर बाद झाले होते. पण शेवटच्या षटकांमध्ये गॅरेथ डेलानीने ४९ आणि जॉर्ज डॉकरेलने १९ धावांची खेळी करुन शेवटच्या ३ षटकांमध्ये तुफान फटकेबाजी केली. याच धावा भारताला शेवटी महागात पडल्या.

आयर्लंडने १५ षटकापर्यंत गडी बाद ११८ धावा केल्या होत्या. त्यानंतर १६ वे षटक टाकण्यासाठी आलेल्या वॉशिंग्टन सुंदरने १९ धावा खर्च केल्या. त्यानंतर संघाची धावसंख्या १३७ धावांवर जाऊन पोहोचली. पुढच्या षटकात प्रसिधने २७ धावा खर्च केल्या. त्यामुळे संघाची धावसंख्या १६४ धावांवर जाऊन पोहोचली. ही २ षटकं भारतीय संघाला चांगलीच महागात पडली.

# श्रद्धाच्या 'ईठा'वर नारायणगावकर कुटुंबीय नाराज,

तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित 'ईठा' चित्रपट जोरदार चर्चेमध्ये आला आहे. 'ईठा'चा टीझर रिलीज झाला असून तो येत्या २८ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. विठाबाई यांच्या जीवनावर, कलेवर आणि संघर्षावर आधारित असणाऱ्या या सिनेमामध्ये अभिनेत्री श्रद्धा कपूर प्रमुख भूमिकेमध्ये असणार आहे. तिच्या लूकचे आणि तिच्या अभिनयाचे कौतुक केले जात आहे. मात्र, चित्रपटाच्या नावावरून वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. चित्रपटाचे नाव हे पूर्ण विठाबाई नारायणगावकर असे दिले जाण्याची मागणी त्यांच्या कुटुंबीयांनी केली आहे. तसेच ३ जुलैपर्यंत चित्रपटाच्या निर्मात्यांनी उत्तर दिले नाही तर योग्य ती कायदेशीर प्रक्रिया केली जाईल, असा इशाराही दिला आहे.







लक्ष्मण उत्तेकर दिग्दर्शित 'ईठा' चित्रपटाच्या नावावरून विठाबाई नारायणगावकर यांच्या कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली आहे. 'आवाज लोकशाहीचा' या यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीमध्ये विठाबाई नारायणगावकर यांचा मुलगा व नातवाने सिनेमाबद्दल मत व्यक्त केले आहे.

विठाबाईंच्या आयुष्यावर चित्रपट निर्मित केला जात आहे, याचा आनंद असला तरी याबाबत त्यांना कोणतीही विचारणा न झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

'ईठा' चित्रपटाच्या टीझरमध्ये त्यांनी स्टेजमागे जाऊन बाळाला जन्म दिल्याचे दाखवण्यात आले आहे. याबाबत विठाबाई यांचा मुलगा कैलास नारायणगावकर म्हणाले, "या चित्रपटाबद्दल आम्हाला एकाच आठवड्यापूर्वी समजले. आम्ही टीझर पाहिला आणि त्यामध्ये माझा जन्म स्टेजमागे झाल्याचे दाखवण्यात आले. आमच्या आईचा संघर्ष बॉलीवूडच्या चित्रपटामध्ये दाखवत आहे, ही नक्कीच अभिमानाची बाब आहे. मात्र, याआधी आम्हाला हे सांगायला हवे होते. आम्ही त्यांच्याबद्दल आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल आणखी माहिती दिली असती आणि यामुळे चित्रपट अधिक आशयघन झाला असता."

ते पुढे म्हणाले, "ग्रामीण भागामध्ये 'विठा' या शब्दाला 'ईठा' बोलले जाते हे मान्य आहे. पण, त्यांचे खरे नाव हे तर विठाबाई आहे. आजच्या नव्या पिढीला त्यांच्या खऱ्या नावाने इतिहास कळाला तर समाधान वाटेल. लक्ष्मण उत्तेकर चित्रपट काढत आहेत याचा अभिमान आहे, पण चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी तो आमच्या कुटुंबाला दाखवावा ही आमची इच्छा आहे. जर चित्रपटामध्ये काही आक्षेपार्ह असेल तर ते सांगता येईल आणि काढून टाकता येईल." विठाबाई नारायणगावकर यांचे नातू मोहित नारायणगावकर यांनी चित्रपटाच्या नावावर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, "महाराष्ट्रातील कोणत्याही लोककलावंताच्या नावापुढे त्याच्या गावाचे नाव लागले तरच तो खरा कलावंत म्हणून शोभून दिसतो. चित्रपटाच्या निर्मात्यांकडे आमची मागणी आहे की, त्यांनी 'ईठा' नाव बदलून विठा करावे आणि नावापुढे सबटायटलमध्ये नारायणगावकर असे पूर्ण नाव द्यावे. अशा दोन ते तीन सूचना मेलद्वारे त्यांच्यापर्यंत पोहचवल्या आहेत. आमचे फक्त नावाबद्दल म्हणणे आहे, बाकी चित्रपट तयार करण्यावरून आमचा विरोध नाही."

# मानधन मागितल्याने अभिनेत्याला धमकी



'लापता लेडीज' चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली होती. चित्रपटाची कथा, सादरीकरण आणि कलाकारांचा प्रभावी अभिनय यामुळे या सिनेमातील प्रत्येक कलाकाराचे कौतुक करण्यात आले. 'लापता लेडीज'फेम अभिनेता सतेंद्र सोनी जोरदार चर्चेमध्ये आला आहे. त्याने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर केला असून एका चित्रपटनिर्मितीचा धक्कादायक अनुभव शेअर केला आहे. सतेंद्र सोनीने रडत व्हिडीओ शेअर करत मानधन न देता धमकावल्याचा आरोप केला आहे. या व्हिडीओमध्ये तो धाय मोकलून रडताना दिसत असून त्याने त्याच्यासह झालेल्या कथित गैरवर्तनाबाबत खुलासा केला आहे. सतेंद्र सोनीचा व्हिडीओ तुफान व्हायरल झाला आहे.

सतेंद्र सोनीने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये तो म्हणाला, "'पेड पालकी' या चित्रपटाच्या शूटिंगसाठी मध्य प्रदेशातील मैहर येथे गेलो होतो. या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्माते पुष्पेंद्र सिंग असून त्यांनी याआधी 'अजमेर ९२' चेही दिग्दर्शन केले होते. त्यांनी मला कामाचे फक्त ५० हजार रुपये आधी दिले आणि शूटिंगसाठी बोलावून घेतले. उरलेली रक्कम शूटिंगवेळी देण्याचे कबूल केले होते. माझे एकूण १० दिवसांचे शूटिंग होते, त्यापैकी मी ७-८ दिवसांचे काम पूर्ण केले आहे. यानंतर पैसे मागण्यासाठी गेलो तर धमकावले आणि मला त्यांनी तिथून हाकलून दिले."

पुढे तो म्हणाला, युनिटमधील कोणालाचा पैसे दिलेले नाहीत आणि मी पैसे मागितले तर माझे पॅकअप केले. १० मिनिटांत हॉटेलमधून चेक-आउट आणि पुढे इथे दिसला नाही पाहिजे, नाही तर मारहाण करू, अशी धमकी पुष्पेंद्र सिंग यांनी दिली. त्यांची पत्नी प्रगती चौहान हिने मुख्य अभिनेत्री म्हणून काम केले असून त्यांनीही अर्वाच्य भाषेमध्ये शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हॉटेलमधून बाहेर पडताना माझ्यासह श्रीधर दुबे आणि पंकज शर्मा आले आहेत." यानंतर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये सतेंद्र सोनी आणि इतर दोन कलाकार मुंबईतील एका रेल्वेस्थानकावर आल्याचे दिसले असून आपण शहरात सुखरूप पोहोचलो असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच, सतेंद्र त्याला आणि इतर कलाकारांना मुंबईत सुखरूप पोहोचण्यास मदत केल्याबद्दल मध्य प्रदेश पोलिस आणि इतरांचे आभारही मानले आहेत.

# 'वीण' सुद्धा तेवढीच घट्ट; सुबोध भावेने सांगितलं ऑफस्क्रीन बॉण्डिंग, तेजश्री प्रधानबद्दल म्हणाला..

वीण दोघांतली ही तुटेना मालिकेत प्रेक्षकांना तेजश्री प्रधान आणि सुबोध भावे यांची ऑनस्क्रीन जोडी पाहायला मिळत आहे. लवकरच मालिकेत समर-स्वानंदीची लव्हस्टोरी सुरू होणार आहे. यानिमित्ताने या दोघांनी टीव्ही माध्यम, कलाकारांचं ऑफस्क्रीन बॉण्डिंग याबाबत दिलखुलास संवाद साधला.

तेजश्री प्रधान 'तारांगण'ला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली, "टीव्ही मालिकांमध्ये काम करताना अनेकांचं असं असतं की, पटकन काम करूयात...मोकळं होऊयात. पण, या सगळ्यात इतका चांगला सहकलाकार मिळणं, आमच्या मालिकेचे इतके सुंदर डायलॉग लिहिलेत...म्हणजे जवळ-जवळ एक सिनेमा केल्याचा फील येतो, ही खूप चांगली गोष्ट आहे. कारण, मला टीव्ही माध्यम कायम महत्त्वाचं वाटलंय आणि हे माध्यम खूप जास्त पॉवरफुल आहे. या माध्यमातून खूप कलाकार घराघरांत पोहोचतात, त्यामुळे टीव्ही माध्यम प्रेक्षकांना पटकन आपलंसंही वाटतं. त्यामुळे 'वीण दोघांतली ही तुटेना' या मालिकेचा मला भाग होता आला ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे."



याबाबत सुबोध भावे म्हणाला, "हो! आम्हा दोघांची वीण सुद्धा तेवढीच घट्ट आहे. कारण, आम्हाला शूटिंगदरम्यान गोष्टी ठरवाव्या लागत नाहीत. गोष्टी न ठरवता आपोआप होतात. कोणतंही काम ओढून ताणून करणं वेगळं आणि सहजतेने करणं वेगळं असतं. जेव्हा आपल्या समोर काम करणारा कलाकार सुद्धा तेवढाच चांगला असतो.... तेव्हा क्रिकेटची एखादी चांगली मॅच पाहताना तुम्हाला जशी मजा येते ना...तशीच मजा त्या कलाकारासह काम करताना येते. तेजू माझ्याबरोबर काम करतेय । Am Happy! तिच्याबरोबर काम करताना खरंच खूप छान वाटतं."

तेजश्री प्रधान म्हणाली, "मालिकेत ज्या महत्त्वाच्या टप्प्याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत होते..तो क्षण आता प्रेक्षकांना लवकरच पाहायला मिळेल. याचबरोबर आपण सगळे पावसाचीही आतुरतेने वाट पाहत होतो. पाऊस आणि वटपौर्णिमेचं शूट या दोन्ही गोष्टी एकत्र जुळून येणं म्हणजे जणू दुग्धशर्करा योगच होता. पावसाच्या सुंदर वातावरणात वटपौर्णिमेचा सीन शूट करताना खूप मजा आली. गेले तीन-चार महिने प्रचंड उष्णतेत शूटिंग सुरू होतं. त्यामुळे हा पावसाचा गारवा आणि ओलावा आम्हा कलाकारांसह टेक्निशिअन्ससाठीही खूप गरजेचा होता. सामान्यतः पावसात शूटिंग करताना चिखल, साडी खराब होणं किंवा इलेक्ट्रिकल उपकरणांमुळे तंत्रज्ञांना होणाऱ्या अडचणी अशा अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. पण यावेळी मुंबईतल्या पहिल्या पावसामुळे सेटवरील प्रत्येकजण आनंदी होता आणि सगळे उत्साहाने काम करत होते. आता मालिकेत समर-स्वानंदीच्या लव्हस्टोरीची सुरुवात होती... हे सीन्स पाहून प्रेक्षकही आनंदी होतील."

# समय रैनाच्या 'इंडियाज गॉट लेटंट'चा नेटफ्लिक्सला फायदा झाला की तोटा?

कॉमेडियन समय रैनाने 'इंडियाज गॉट लेटंट'चा दुसरा सीझन सुरू करीत दमदार पुनरागमन केले आहे. पहिल्याच एपिसोडमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची नक्कल आणि सुकृत देव याचा अभिनय सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. जबरदस्त वादानंतर समयने पुन्हा एकदा शो सुरू केल्यामुळे तरुणाईने मोठ्या उत्साहात पहिल्याच एपिसोडला प्रतिसाद दिला. 'इंडियाज गॉट लेटंट'चा दुसरा सीझन हा नेटफ्लिक्ससह यूट्यूबवरही प्रदर्शित झाला आहे. एखादा शो हा सशुल्क आणि नि:शुल्क अशा दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होण्याची ही पहिलीच वेळ आहे. प्रेक्षकांनी दोन्हीपैकी कोणत्या प्लॅटफॉर्मला जास्त पसंती दिली याची आकडेवारी समोर आली आहे.




पहिल्याच भागामध्ये अभिनेत्री आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ सहभागी झाल्या होत्या. त्यांच्या 'अल्फा' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी त्या शोमध्ये आल्या होत्या. दोघींची उपस्थिती आणि विनोद हे लक्षवेधी ठरले आहेत. शोमधील अनेक रील या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाल्या असून, नेटकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला आहे.

या शोमधील मराठी कलाकार सुकृत देव लोकप्रिय झाला असून, त्याचा अभिनय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. 'इंडियाज गॉट लेटंट'चा दुसरा सीझन हा साप्ताहिक स्वरूपात प्रदर्शित केला जाणार आहे. "द ग्रेट इंडियन कपिल शो'प्रमाणे दर आठवड्याला नवीन भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यूट्यूब या मोफत माध्यमावर एपिसोड उपलब्ध असल्यामुळे नेटफ्लिक्सच्या व्ह्युजवर त्याचा परिणाम झाला आहे.

'इंडियाज गॉट लेटंट'च्या दुसऱ्या सीझनला तरुणाईचा प्रचंड प्रतिसाद मिळत असला तरी यूट्यूब आणि नेटफ्लिक्स या दोन्ही प्लॅटफॉर्मवरील आकडेवारीमध्ये मोठी तफावत दिसून आली आहे. समय रैनाच्या यूट्यूब चॅनेलवर अपलोड करण्यात आलेल्या पहिल्या भागाला २५ जून रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत तब्बल ४.५ कोटींहून अधिक व्ह्युज मिळाले आहेत. मात्र, नेटफ्लिक्सवरील आकडेवारी यापेक्षा खूपच कमी असल्याचे समोर आले आहे.

नेटफ्लिक्सच्या अधिकृत टुडम डेटानुसार, या एपिसोडला २२ लाख व्ह्युज मिळाले असून, हा शो सध्या ग्लोबल टॉप १० नॉन-इंग्लिश शोच्या यादीत सातव्या क्रमांकावर आहे. नेटफ्लिक्सने दिलेल्या माहितीनुसार, व्ह्युजची संख्या ही एकूण पाहिलेल्या तासांची संख्या आणि एपिसोडच्या कालावधीच्या आधारे मोजली जाते. समय रैनाच्या 'इंडियाज गॉट लेटेंट सीझन २'मध्ये सुकृत देव नुकताच झळकला आणि त्याने त्याच्या काही क्षणांच्या सादरीकरणातून अनेकांची पसंती मिळवली आहे. सुकृतने 'इंडियाज गॉट लेटेंट सीझन २'मध्ये एका दारूड्या व्यक्तीची भूमिका साकारली होती. सुकृतने त्याची पात्रावरील पकड, अभिनय यांमुळे कार्यक्रमात उपस्थित सर्वांची मनं जिंकून घेत, कौतुकाची दाद मिळवली. मराठी मालिका आणि रंगभूमीवर काम करणाऱ्या सुकृतने या शोमध्ये सहभागी होण्यापूर्वी माध्यमांच्या वृत्तानुसार सहा ते सात हजार इतके फॉलोअर्स होते, ज्यामध्ये आता वाढ झाली असून इन्स्टाग्रामवर दोन लाख ५४ हजार इतके फॉलोअर्स झाले आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ज्ञजलयुक्त, समृद्ध महाराष्ट्र संकल्पनेला बुलढाण्यात बळ

## टाटा ट्रस्ट-मानवलोकच्या उपक्रमातून शाश्वत शेतीला चालना

बुलढाणा/बुलढाणा

राज्यातील जलसंधारण, मृदसंवर्धन आणि शाश्वत शेतीला प्राधान्य देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या धोरणांना बुलढाणा जिल्ह्यात प्रत्यक्ष कृतीची जोड मिळत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यात जलसंपदा संवर्धन, हवामान बदलाला तोंड देणारी शेती आणि ग्रामीण विकासाला दिलेल्या प्राधान्यानुसार टाटा ट्रस्ट आणि मानवलोक यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेला इंटिग्रेटेड सॉईल अँड वॉटर रिसोर्सेस मॅनेजमेंट () प्रकल्प जिल्ह्यातील चिखली व बुलढाणा तालुक्यात ग्रामीण परिवर्तनाचा नवा आदर्श ठरत आहे. पाच वर्षांच्या या प्रकल्पाची अंमलबजावणी ४० गावांमध्ये सुरू असून सुमारे २७ हजार कुटुंबांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. पाणी अडविणे, भूजल पातळी वाढविणे, मृदसंवर्धन, शेतीची उत्पादकता वाढविणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प राबविला जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सातत्याने मांडलेल्या ज्ञपाणी हेच समृद्धीचे मूळफ या विचाराशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या प्रकल्पांतर्गत १० गावांमध्ये १५ चेकडॅममधील गाळ काढण्याची कामे, १२ कॉम्पोझिट गॅबियन संरचना, २०० जलतारा, २०० एकर क्षेत्रावर कंटूर बंडिंग आणि ५ किलोमीटर नदी खोलीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांमुळे पावसाचे पाणी अधिक प्रमाणात जमिनीत मुरून भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार असून सिंचनाची उपलब्धता सुधारेल. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २० समुदाय संसाधन व्यक्ती () नियुक्त करण्यात आल्या आहेत. सर्व ४० गावांमध्ये ग्राम विकास समित्यांची स्थापना पूर्ण झाली असून ३६ ग्रामपंचायतींची ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत. बेसलाईन सर्वेक्षणासह विविध शासकीय विभागांशी समन्वयाचे कामही सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शाश्वत कृषी विकासाच्या दृष्टीकोनानुसार वैज्ञानिक शेतीलाही प्राधान्य देण्यात आले आहे. आतापर्यंत ३०० शेतकऱ्यांची माती परीक्षणे करण्यात आली असून त्यानुसार पीक नियोजन आणि पोषण व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन दिले जात आहे. जलसंधारणासोबतच क्षमता विकास, जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनावरही भर दिला जात आहे. या प्रकल्पामुळे पुढील पाच वर्षांत शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नात सुमारे २५ टक्के वाढ, मातीची धूप ५० टक्क्यांपर्यंत कमी होणे, भूजल पातळीत वाढ, रब्बी हंगामातील लागवड क्षेत्र विस्तार आणि ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. राज्य शासनाच्या जलसंवर्धन आणि शाश्वत ग्रामीण विकासाच्या धोरणांना पूरक ठरणारा हा उपक्रम बुलढाणा जिल्ह्यात जल, मृदा आणि शेती व्यवस्थापनाचा प्रभावी नमुना ठरत असून, लोकसहभागाच्या बळावर ग्रामीण समृद्धीचा नवा अध्याय लिहिण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसविण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

राज्य परिवहन विभागाच्या निर्देशानुसार १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने वाहनधारकांना तातडीने नोंदणी करून बसवून घेण्याचे आवाहन केले आहे. ही विशेष सुरक्षा वैशिष्ट्ये असलेली क्रमांक प्लेट असून त्यामध्ये क्रोमियम आधारित होलोग्राम, लेझर कोड आणि कायमस्वरूपी लॉकिंग व्यवस्था असते. त्यामुळे वाहनांची ओळख पटविणे सुलभ होते तसेच चोरी, बनावट क्रमांक प्लेटचा वापर आणि अन्य गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. वाहनधारकांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. नोंदणी केल्यानंतर नियुक्त केंद्रावर वेळापत्रकानुसार बसवून घेता येणार आहे. वाहनांच्या प्रकारानुसार शुल्क निश्चित करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, निर्धारित मुदतीनंतर नसलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येऊ शकते. त्यामुळे सर्व दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहनधारकांनी विलंब न करता बसवून घ्यावी. वाहनधारकांनी अधिकृत केंद्रांची माहिती आणि नोंदणी प्रक्रियेविषयी तपशील संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून घ्यावा, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

# दुचाकींसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकांचा २ जुलैला लिलाव

## ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

जनसंचलन-बुलढाणा

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय खामगाव येथे दुचाकी वाहनांसाठी आकर्षक (फॅन्सी) नोंदणी क्रमांक मिळविण्याची नवीन ऑनलाइन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक वाहनधारकांनी १ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर करून निर्धारित शुल्कासह डिमांड ड्राफ्ट (डीडी) जमा करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केले आहे. एखाद्या नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास संबंधित अर्जदारांची यादी नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर २ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, खामगाव येथे खुल्या लिलावाद्वारे संबंधित क्रमांकाचे वाटप करण्यात येणार आहे. लिलावासाठी सादर करण्यात येणारा डिमांड ड्राफ्ट यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेचा असावा व तो दोन महिन्यांपेक्षा जुना नसावा. प्रत्येक पसंती क्रमांकासाठी स्वतंत्र डीडी आणि स्वतंत्र अर्ज आवश्यक असून, विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचा डीडी ग्राह्य धरला जाणार नाही. एका अर्जदारास एका क्रमांकासाठी एकच अर्ज करता येईल. लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक ऑनलाइन आरक्षित करण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे. वाहनधारकांना https://Fancyparivahan.gov.in या संकेतस्थळावर नाव, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक नोंदवून अर्ज व शुल्क भरल्यानंतर पसंतीचा क्रमांक आरक्षित करता येणार असून, त्यासाठी कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता राहणार नाही.

# जिल्ह्यात २ लाख ३० हजार बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्याचे उद्दिष्ट

जनसंचलन/बुलढाणा



पोलिओमुक्त भारताचा दर्जा कायम राखण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ रविवारी प्राथमिक आरोग्य केंद्र हतेडी अंतर्गत उपकेंद्र कोलवड येथे उत्साहात झाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते, वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण जवंजाळ, डीईएमओ राजेश धुताडमल, समुदाय आरोग्य अधिकारी, गावाच्या सरपंच सौ. मीराताई पवार, उपसरपंच चंद्रभागाताई पाटील, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी तसेच लाभार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील २ लाख ३० हजार ४०१ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी जिल्हाभरात २ हजार ६९ लसीकरण बूथ उभारण्यात आले असून मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि स्वयंसेवक कार्यरत आहेत. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी पालकांना आवाहन करताना सांगितले की, पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब पाजणे ही पालकांची जबाबदारी असून कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. उपस्थित मान्यवरांनीही पालकांनी आपल्या बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजून राष्ट्रीय मोहिमेला यशस्वी करण्याचे आवाहन केले.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
City
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
बुलडाणा
City NEWS
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# धाड पोलीस स्टेशनचा पदभार अजिनाथ मोरे यांच्याकडे

जनसंचलन-धाड

धाड पोलीस स्टेशनचे नवीन ठाणेदार म्हणून अजिनाथ मोरे यांनी आज, २९ जून रोजी दुपारी १२ वाजता अधिकृतपणे आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. माजी ठाणेदार प्रताप भोस यांची बदलीनंतर रिक्त झालेल्या जागेवर अजिनाथ मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन ठाणेदार अजिनाथ मोरे यांनी यापूर्वी जानेफळ पोलीस स्टेशनचे ठाणेदार म्हणून तब्बल अडीच वर्षे कर्तव्य बजावले आहे. आपल्या कार्यकाळात एक बेदाग अधिकारी म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली आहे. राजरोसपणे सुरू असणाऱ्या बेकायदेशीर रेती उपसा आणि वाहतुकीला पूर्णपणे खीळ घालणे, परिसरात फोफावलेली गुटखा तस्करी, वरली मटका आणि जुगारासारखे अवैध धंदे मुळासकट उपटून टाकणे,



तसेच कायदा व सुव्यवस्था पूर्वपदावर आणून गुन्हेगारी प्रवृत्तींवर कडक अंकुश मिळवणे, या आव्हानांना तोंड देण्याचे मोठे आव्हान आहे. नागरिकांच्या अपेक्षा आणि विश्वास धाड परिसरातील कायदाप्रिय नागरिकांना नवीन ठाणेदार अजिनाथ मोरे यांच्याकडून प्रचंड अपेक्षा असून आता नवीन ठाणेदार आपल्या बेदाग कार्यशैलीच्या जोरावर या सर्व अवैध धंद्यांचा बिमोड करून धाड परिसराला गुन्हेगारीमुक्त कसं करतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पाच वर्षातील बालकांना पाजण्यात आला पोलिओचा डोस

जनसंचलन/बुलढाणा

शुन्य ते पाच वयोगटातील सर्व मुलांना पोलिओचा धोका टाळण्यासाठी व संपूर्ण उच्चाटनासाठी भारत सरकारद्वारे पल्स पोलिओ लसीकरण मोहीम आज पासून देशभर राबविल्या जाते आहे .शून्य ते पाच वयोगटातील सुमारे १५.६ करोड बालकांना या मोहिमेअंतर्गत पोलिओचा डोस पाजला जाणार आहे .अशी माहिती केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली पोलिओमुक्त भारताचा दर्जा कायम राखण्यासाठी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत २८ जून रोजी ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देण्यात पाजण्यात येत आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथील आरोग्य लसीकरण बुथला केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट देऊन लसीकरणासाठी आलेल्या



बालकाला पोलिओचा डोस पाजला. या मोहिमेसाठी आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले असून देशांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी लसीकरण बूथ उभारण्यात आले आहे बूथवरील लसीकरणानंतर पुढील पाच दिवस घरभेटींद्वारे वंचित राहिलेल्या बालकांना पोलिओचे डोस देण्यात येणार आहेत. इंङ्वपोलिओ हा कायमस्वरूपी अपंगत्व आणणारा आजार आहे. त्यामुळे ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब देणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना जवळच्या पोलिओ बूथवर आणून लसीकरण करून घ्यावे.फ्फ असे आवाहन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

# जगाला वाचविण्यासाठी आदिवासींच्या भाषेतील ज्ञानपरंपरा समजून घेणे गरजेचे - प्रशांत सोनोने

जनसंचलन/बुलढाणा

निसर्गाला केंद्रस्थानी ठेवून शाश्वत विकासाची संकल्पना मांडणाऱ्या व जगाला विनाशातून वाचविणाऱ्या आदिवासी समूहाची ज्ञानपरंपरा समजून घ्यायची असेल तर त्यांच्या भाषा जपल्या पाहिजेत, असे आवाहन जल जमिन जंगल चळवळीचे कार्यकर्ते आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक व प्रसिद्ध छायाचित्रकार प्रशांत सोनोने यांनी येथे केले. विदर्भ महाविद्यालय व मुक्ता प्रबोधिनी, अमरावती आयोजित भाषा, आत्मसन्मान आणि लोकशाही या विषयावर राज्य स्तरीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी जिजाऊ सभागृहात ते बोलत होते.समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा.मुनेश्वर जमईवार होते,तर प्राचार्य गोविंद गायकी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते.प्रशांत सोनोने पुढे म्हणाले की आजघडीला संपूर्ण जगात सर्वाधिक भाषा सुमारे १२५० व वैविध्यपुर्ण संस्कृती केवळ भारतात आहेत.यातील अध्याधिक भाषा केवळ अन् केवळ आदिवासींच्याच आहेत. प्रत्येक भाषेचा एक वैशिष्ट्यपूर्ण जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन असतो, जीवनदृष्टी असते,जगण्याचं तत्त्वज्ञान,शहाणपण असतं, हजारो वर्षांपासून अर्जीत केलेलं हे ज्ञान व ह्या समृद्ध ज्ञान परंपरेचं जतन ही जीवसृष्टी वाचविण्यासाठी अत्यावश्यक आहे.परंतु आज मात्र जागतिक पातळीवर तथाकथित भ्रामक विकासाच्या नावाखाली आदिवासींचे विस्थापन चालू आहे.जिथे आदिवासी तिथेच धरण त्यातच आहे आदिवासींचे मरण।जिथे आदिवासी तिथेच खाण, त्यातच झाली आदिवासी जिवनाची घाण, जिथे आदिवासी तिथेच विविध प्रकल्प,हा आहे आदिवासींना मारण्याचा दृढ संकल्प. जगभरात भांडवलदारी व्यवस्थेचे भरणपोषण करण्यासाठी आदिवासींच्या विस्थापनाचे कटकारस्थान करण्यात येत आहे.आदिवासीसाठी वन हेच जीवन असून,त्यांच्या नैसर्गिक रहिवासातून त्यांचे विस्थापन हे त्यांच्या भाषा संस्कृती पासूनच उखडने असते. जगभरातील नवसाम्राज्यवादी देश हव्यासापोटी आदिवासींची निसर्गधर्मी संस्कृती, भाषा, कला आणि ज्ञान नष्ट करून . त्यांच्यावर आपली भाषा व विकृत संस्कृती लादीत आहेत.न्युगी



वा थियांगो या ख्यातनाम आफ्रिकन साहित्यिकाने म्हटले कोणताही देश दुसऱ्या देशाला सैन्य आक्रमणाद्वारे वा त्यांच्या आर्थिक नाड्या दाबून कदापिही गुलाम करू शकत नाही,तर आपली भाषा व संस्कृती त्यांच्यावर लादूनच त्यांना अपरिमित काळापर्यंत गुलाम करित असतो, म्हणून मेंदूचे विउपनिवेशिकरण करणे आत्यंतिक गरजेचे सांगितले. करिता हा सांस्कृतिक नरसंहार तत्काळ थांबविण्यासाठी भाषा संरक्षण व संवर्धन करणाऱ्या जगभरातील भाषा तज्ञांनी आदिवासीच्या मूलभूत जल, जंगल जमीनीच्या लढ्यात उतरणे गरजेचे असल्याचे शेवटी प्रशांत सोनोने यांनी व्यक्त केले.कार्यशाळेच्या समारोपाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.निलेश राऊत यांनी केले,तर आभार प्रदर्शन संजय पांडे अधीक्षक विदर्भ महाविद्यालय यांनी केले.

# डोणगाव येथे पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात संपन्न
## शंकर जिनिंग बुथवर १००% उद्दिष्ट पूर्ण



जनसंचलन-डोणगाव

डोणगाव येथील आरोग्य विभाग आणि अंगणवाडी केंद्रांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली पोलिओ लसीकरण मोहीम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे संपन्न झाली. डोणगाव परिसरातील बालकांना पोलिओचे सुरक्षा कवच देण्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली होती.नऊ बुथवर लसीकरण व्यवस्थाया मोहिमे अंतर्गत संपूर्ण डोणगाव परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी एकूण नऊ वेगवेगळ्या ठिकाणी लसीकरण बुथची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये पालकांनी आपल्या लहान बालकांना घेऊन मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.शंकर जिनिंग बुथवर १००% लसीकरणया मोहिमेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, येथील शंकर जिनिंग मधील लसीकरण बुथवर प्रशासनाने ठेवलेले उद्दिष्ट १००% पूर्ण झाले आहे. या बुथ अंतर्गत येणाऱ्या सर्व पात्र बालकांना पोलिओचे डोस देऊन सुरक्षित करण्यात आले.अंगणवाडी सेविकांचे मोलाचे योगदानही मोहीम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका पुष्पाताई खैरे, सौ. स्मिता काळे आणि सौ. अनुसया धांडे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी घरोघरी जाऊन पालकांमध्ये जनजागृती केली आणि शंकर जिनिंग बुथवरील लसीकरण शंभर टक्के यशस्वी करून दाखवले. या कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८